दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
www.raigadnagari.com
/ raigadnagari
वर्ष २० वे | अंक १५४ | MAHMAR/2006/17212 | रायगड | गुरुवार, दि.२१ ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## नगराध्यक्ष संजय कर्णिक यांनी दिला पदाचा राजीनामा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात पक्ष नेतृत्वाने जाहीर केले नुसार लोकप्रतिनिधित्व करण्यासाठी सर्वांना संधी देण्यात येते. पक्ष शिस्त आणि नेत्यांचे आदेश अशी म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसची आज पर्यंतची वाट सुरू आहे.

म्हसळा नगर पंचायतीचे कर्तव्यदक्ष व लोकप्रिय नगराध्यक्ष संजय कर्णिक यांनी त्यांचे नगराध्यक्ष पदाचा दिड वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केला असल्याने त्यांनी स्वतः हून आपल्या पदाचा राजीनामा रायगड जिल्हा अधिकारी यांच्याकडे दिला आहे.नगराध्यक्ष संजय कर्णिक यांनी त्यांचे कार्यकाळात खासदार सुनिल तटकरे,मंत्री आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसळा नगरीत सर्व समावेशक मोठ मोठी विकास कामे करण्यात यशस्वी झाले आहेत.त्यांनी स्वतःहून आपल्या अन्य सहकारी नगरसेवकांना पदाचा मान मिळण्यासाठी आज दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी मा.रायगड जिल्हा अधिकारी यांना लेखी पत्र देऊन राजीनामा दिला असल्याचे आमच्या प्रतिनिधीला कळवले आहे. नगराध्यक्ष पदाची निवड होई पर्यंत नगराध्यक्ष पदाचा कार्यभार उपनगराध्यक्ष संजय दिवेकर यांच्या कडे असणार आहे.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण लोकनेते दि.बा.पाटील यांच्या नावाने होणारच

**दै.रायगड नगरी । पनवेल**
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्यासाठी उभारण्यात आलेल्या चळवळीबाबत काही अनावश्यक आक्षेप नोंदवले जात आहेत.

या संदर्भात ठाम विश्वास आहे की केंद्र सरकार विमानतळ सुरू होण्यापूर्वीच नामकरणाचा निर्णय घेईल. या चळवळीला केंद्र सरकारकडून नेहमीच सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे आणि स्थानिकांची भावना सन्मानाने मान्य केली जाईल.

हेही लक्षात ठेवले पाहिजे की, आज आक्षेप घेणारे लोक त्यावेळी आंदोलनाला पाठिंबा देत नव्हते, जेव्हा तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने या नामकरण चळवळीला मारक ठरणारा निर्णय घेण्याचा प्रयत्न केला होता. त्या काळात ते मौन बाळगत होते,



हे सर्व जनतेला माहीत आहे.

याशिवाय, या संदर्भातील समितीचे अध्यक्ष हे तटस्थ असणे अपेक्षित असताना त्यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आमदार श्री. महेश बालदी यांच्या विरोधात भूमिका घेतली होती. श्री. बालदी यांनी या नामकरणासाठी झालेल्या सर्व आंदोलने उर्जेने पुढे नेली, अगदी त्यासाठी त्यांना खटलेसुद्धा भोगावे लागले. अशा व्यक्तीच्या प्रयत्नांना नाकारणे आणि त्यांच्या विरोधात भूमिका घेणे हा सरळसरळ राजकीय हेतू आहे.

> लोकनेते दि. बा. पाटील यांचे योगदान आणि जनतेची भावना लक्षात घेऊन हा विमानतळ त्यांच्याच नावाने होणार, यात कोणतीही शंका नाही. हे नामकरण केवळ एका पक्षाचे वा नेत्याचे नसून, संपूर्ण रायगड जिल्ह्याच्या भावनांचा आणि जनतेच्या हक्कांचा विषय आहे.
>
> **– प्रशांत ठाकूर, आमदार, भाजप – पनवेल विधानसभा**

## पाण्याची टाकी फुटल्याने सा.बां. विभागाच्या कामावर प्रश्नचिन्ह

**दै.रायगड नगरी । पनवेल**
पनवेल शहरातील प्रशासकीय भवनाच्या वर असणारी १० हजार लिटरची पाण्याची टाकी फुटल्याने पीडब्ल्यूडीच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

एक ते दीड वर्षापूर्वी पनवेल येथील प्रशासकीय भवन सुरू करण्यात आले. या ठिकाणी अपर तहसील कार्यालय, मुद्रांक शुल्क विभाग कार्यालय सुरू करण्यात आले आहेत. प्रशासकीय भवनाच्या वर पाण्याच्या टाक्या ठेवण्यात आल्या आहेत. मात्र ही पाण्याची टाकी फुटल्याने यातील सर्व पाणी वाया गेले. दहा हजार लिटरची पाण्याची टाकी काहीच वर्षात कशी फुटू शकते असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे. काही वर्षातच पाण्याची टाकी फुटल्याने पीडब्ल्यूडीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. वर असणारी पाण्याची टाकी फुटल्याने अधिकारी तसेच येथे येणाऱ्या नागरिकांना देखील पिण्याच्या पाण्याची वानवा निर्माण झाली आहे. अशा



प्रकारचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

## सद्भावना दिवस निमित्ताने महापालिका मुख्यालयात प्रतिज्ञा



**दै.रायगड नगरी । पनवेल**
दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या ८१व्या जयंतीनिमित्त आज महापालिका मुख्यालयात सद्भावना दिवस प्रतिज्ञा देण्यात आली.

जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करण्याची, तसेच सर्व प्रकारचे मतभेद हिंसाचाराचा अवलंब न करता संविधानिक मार्गानी सोडविण्याची प्रतिज्ञा, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे,मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजु पाटोदकर यांनी उपस्थितांना दिली.

यावेळी महापालिका सचिव अक्षय कदम, महापालिका अधिकारी व कर्मचारी तसेच विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## घरकाम करणाऱ्या महिलेने केली दागिन्यांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**
खारघर वसाहत सेक्टर १४ येथील रघुनाथ विहार या सोसायटीमधील एका सदनिकेत घरकाम करणाऱ्या महिलेने तब्बल पाच लाख रुपयांच्या दागिन्यांची चोरी केली आहे. या प्रकरणी खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सेक्टर १४ येथील रघुनाथ विहार या सोसायटीमध्ये राहणाऱ्या ६८ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीमध्ये त्यांच्या घरात काम करण्यासाठी नेमलेल्या महिलेने कपाटामध्ये ठेवलेल्या दागिन्यांवर डल्ला मारला आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणी घरकाम करणाऱ्या महिलेवर कारवाई केली. पोलिसांनी कामगारांचे चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र तपासण्याचे आवाहन केले आहे.

## रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसाचा कहर, अतिवृष्टीत बेणसेतील घर कोसळले

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**
रायगड जिल्ह्यात मागील पाच दिवसांपासून धुवाधार पाऊस कोसळतोय, अतिवृष्टीने जिल्ह्यात अनेक ठिकाणी दरड व घरे कोसळण्याच्या घटना घडल्या. पेण तालुक्यातील बेणसे येथे यमुनाबाई घासे यांचे घर सोसाट्याचा वादळवारा व मुसळधार पावसात कोसळले, घराची कौले फुटली.

यावेळी घरात वास्तव्यास असलेले काशिनाथ सुतार यांचे कुटुंब या आपत्तीत सुदैवाने बचावले. यावेळी गावकरी घटनेचे गांभीर्य पाहून मदतीला धावले. या दुर्घटनेत घरगुती साहित्याचे नुकसान झाले. यावेळी बोलताना काशिनाथ सुतार म्हणाले की काही दिवस अतीमुसळधार पावसाने अक्षरश थैमान घातले आहे . शिहू बेणसे विभागात देखील दिवसरात्र मुसळधार पाऊस कोसळत आहे. सोसाट्याचा वादळवारा व जोरदार पाऊस यामुळे आम्ही राहत असलेल्या घराचा काही भाग माझे कुटुंब गाढ झोपेत असताना कोसळला, मोठा आवाज झाल्याने सारे हादरून गेले, या घटनेत आम्हाला कुणाला दुखापत झाली नाही, साहित्याची मोडतोड झाली. शासनाने नुकसान भरपाई देण्याची मागणी काशिनाथ सुतार कुटुंबीयांनी केलीय.



## वादळी हवामानामुळे सागरी प्रवासी वाहतूक बंद ; प्रवाशांचे हाल

**दै.रायगड नगरी । उरण**
मागील काही दिवसांपासून वादळी वाऱ्यासह कोसळणाऱ्या पावसामुळे विविध बंदरात सहाव्यांदा धोक्याचा इशारा देणारा तीन नंबरचा बावटा लावण्यात आला आहे. यामुळे शनिवारी पासून गेटवे-एलिफंटा, गेटवे-जेएनपीए, मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस या मार्गावरील सागरी प्रवासी वाहतूक बंद करण्यात आली असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्यांचे हाल झाले आहेत.

भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या इशाऱ्यात राज्यात १६ ते २१ ऑगस्टदरम्यान अतिवृष्टीसह वादळी वाऱ्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दरम्यान ताशी ५०-६० किमी वाऱ्यासह समुद्रात खवळलेली स्थिती राहणार असून, मच्छीमारांनी या कालावधीत समुद्रात जाणे टाळावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. यामुळे सलग सहा दिवस सागरी प्रवासी वाहतूक बंद राहणार आहे. खराब हवामान आणि अवकाळी पावसाचा फटका सागरी प्रवासी वाहतुकीलाही मोठ्या प्रमाणावर बसला आहे. त्यातच बंदरात धोक्याचा इशारा देणारा तीन नंबरचा बावटा दोन महिन्यांत पाचव्यांदा विविध बंदरांत लावला आहे. त्यामुळे खबरदारीची उपाययोजना म्हणून गेटवे ऑफ इंडिया-एलिफंटा गेटवे जेएनपीए सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक शुक्रवारपासून बंद केल्याची माहिती गेटवे मुंबई जल वाहतूक संस्थेचे सचिव इक्बाल मुकादम यांनी दिली.

मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस या दरम्यानची सागरी प्रवासी वाहतूकही शुक्रवारपासून बंद केल्याची माहिती मोरा बंदर विभागाकडून देण्यात आली. धोक्याच्या इशाऱ्यानंतर या सागरी मार्गावरील प्रवासी, पर्यटक वाहतूक शुक्रवार दुपार पासूनच कोलमडली आहे. बुधवारी पावसाने काही प्रमाणात विश्रांती घेतली असल्याने हवामान विभागाने हवामान सुरळीत असल्याचे सांगितल्यास गुरुवार पासून या सर्व मार्गावरील सागरी वाहतूक सुरू होण्याची शक्यता आहे. विविध सागरी मार्गावरील पर्यटक, प्रवासी सेवा खंडित झाल्याने दररोज प्रवास करणाऱ्या हजारो प्रवासी, पर्यटकांची गैरसोय झाली आहे.

## माथेरान दस्तुरी पार्किंगमध्ये झाड कोसळून पर्यटकांच्या वाहनांचे मोठे नुकसान ; प्रशासन झोपेत?

**दै.रायगड नगरी । माथेरान**
कर्जत तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसासह सोसाट्याच्या वाऱ्याने माथेरान येथे पुन्हा एकदा अनर्थ घडवला आहे. दस्तुरी नाक्यावरील बस स्टॉप शेजारील वाहन पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या तीन चारचाकी आणि एका दुचाकीवर मोठे झाड कोसळून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.सुदैवाने हा अपघात रात्री घडल्याने त्या ठिकाणी पर्यटक उपस्थित नव्हते, त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. परंतु, जर हा प्रकार दिवसा घडला असता तर गंभीर दुर्घटना घडली असती म्हणून स्थानिकांचे म्हणणे आहे.

कर्जत तालुक्यात मागील ४८ तासात मुसळधार पावसाने सर्वसामान्यांना झोडपून काढले असून जीवनमान विस्कळीत झाले आहे. अशातच रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात येत असलेल्या थंड हवेचे ठिकाण माथेरान येथे सर्वाधिक पावसाची नोंद झालेली आहे. मुसळधार पाऊस आणि



सोसाट्याचा यामुळे येथील आल्हाद दायक वातावरण येथील पर्यटकांना सुखद वाटत असले तरी येथील झाडे उन्मळून पडल्याने नागरिकांचे नुकसान झाले आहे. दरम्यान माथेरान वाहन तळ येथील पार्किंग मध्ये पार्क केलेल्या पर्यटकांच्या वाहनांवर झाड उन्मळून पडल्याने तीन चारचाकी वाहनांचे नुकसान झाले असून एका स्कुटीचे नुकसान झाले आहे.

गेल्या दीड महिन्यात अशी चौथी घटना घडली असून आतापर्यंत दहा पेक्षा जास्त वाहनांचे यामुळे नुकसान झालेले आहे त्यामुळे येथील पर्यटकांच्या वाहनांची सुरक्षा कोणाच्या भरोशावर असा प्रश्न समोर असून,पार्किंगसाठी शुल्क आकारले जाते, मग सुरक्षेची जबाबदारी प्रशासन टाळतंय का असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला.

पर्यटकांकडून सातत्याने शुल्क आकारूनही पार्किंग परिसरात सुरक्षा व्यवस्था नसल्याने पर्यटकांचा विश्वास डळमळीत होत आहे. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे पर्यटकांचा जीव आणि मालमत्ता दोन्ही धोक्यात आहेत.


स्थानिकांच्या मते, प्रशासनाने जर वेळेवर झाडांची छाटणी, देखभाल आणि सुरक्षितता उपाययोजना केल्या असत्या तर आज एवढे नुकसान झाले नसते. त्यामुळे आता प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी पर्यटक आणि स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# कशेडी घाटातील जुन्या राष्ट्रीय महामार्गावरील खचलेल्या 'डेंजर झोन'मध्ये कोसळली दरड

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**
मुंबई गोवा महामार्गावरील कशेडी घाटातील भोगाव गावच्या हद्दीतील सन २००५ पासून सातत्याने रस्ता खचण्याने डेंजर झोन म्हणून ओळखला जाणारा रस्ता आणखी खचला असून या ठिकाणी आज दरड देखील कोसळली आहे.

यंदा अवकाळी पाऊस सुरू झाल्यापासून मुंबई गोवा महामार्गाचे चौपदरीकरण झालेल्या एन एच ६६ या नवीन महामार्गावर तर कधी जुन्या एन एच १७ महामार्गावर दरडी कोसळत आहेत. भोगाव गावाच्या हद्दीतील सातत्याने खोल खचणाऱ्या रस्त्यावर आज दरड कोसळली असून हा डेंजर झोन म्हणून ओळखला जाणारा रस्ता देखील नेहमीपेक्षा जास्त खचल्याचे दिसून आले.

मे २००५ मध्ये खेड येथील एका कन्स्ट्रक्शन कंपनीने या डेंजर झोनमध्ये मोरीसाठी ब्लास्टींग केल्यानंतर साधारणपणे ९० ते १०५ मीटर लांब अंतराचा रस्ता १० फुटांपेक्षा अधिक खोल खचला आहे. आतापर्यंत कोट्यवधी रुपयांची मलमपट्टी



झालेल्या या रस्त्यावर मंगळवारी दरड कोसळली आहे.

या घटनेबाबत राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभाग व प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याने भोगाव, कातळी बंगला पळचिल व गोलदरा या भागातील स्थानिक नागरिक आणि प्रवासी जनतेकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या ठिकाणी अवकाळी पावसामुळे आणि जून महिन्यातही सुरू असणारे रस्ता दुरुस्तीचे काम ठेकेदार आणि महामार्ग प्रशासनाकडून धीम्या गतीने सुरू असलेले काम काही कालावधीनंतर बंद झाले आहे. या डेंजर झोनमध्ये तातडीने आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास जेसीबी उभा करण्यात आला होता. तो देखील हलविण्यात आला आहे.

येत्या आठ दिवसावर कोकणवासीयांना प्रिय गौरी गणपतीचा सण येणार असताना या ठिकाणी सातत्याने खचणारा डेंजर झोन महामार्ग आणि त्यावर कोसळणाऱ्या दरडी यामुळे नजिकच्या काळात मोठी दुर्घटना झाल्यास या परिसरातील २६ गाव व वाडी वस्तीतील जनतेचा धोकादायक मार्गावरून सुरू असणारा दररोजचा प्रवास जीवघेणा ठरण्याची शक्यता लक्षात घेता यावर तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

यंदा जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पळचिल येथील माजी उपसरपंच उमेश मोरे यांनी बांधकाम प्रशासन व तहसीलदार कपिल घोरपडे यांच्याशी संपर्क साधून विनंती केली असता तहसीलदार घोरपडे यांनी तात्काळ दखल घेऊन या मार्गावर तडे गेलेले रस्त्याची पाहणी करून खचलेल्या भोगाव हद्दीतील रस्त्याची पाहणी करून संबंधितांना तात्काळ रस्ता दुरुस्तीचे आदेश दिले होते. नेहमीप्रमाणे या ठिकाणी तात्पुरती मलमपट्टी करण्यात येऊन या भेटीचा गाजावाजा मोठ्या प्रमाणात झाला. मात्र, डेंजर झोनची धोकादायक परिस्थिती जैसे थे असल्याने जनतेतून नाराजी व्यक्त होत आहे.

पोलादपूर तालुक्यात गेले तीन दिवस संततधार सुरू असल्याने हा डेंजर झोन रस्ता पुन्हा खोल खचला असून याच ठिकाणी आज दरड कोसळून एक भला मोठा दगड रस्त्यावर आल्याने प्रशासन जनतेचा बळी गेल्यानंतर जागे होणार काय अशी संतप्त भावना व्यक्त होत आहे. या डेंजर झोनची तत्कालीन पालकमंत्री व विद्यमान खासदार सुनील तटकरे, माजी बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण तसेच अनेक राजकीय नेत्यांनी पाहणी करून दुरुस्तीचे आदेश दिले आहेत. त्यावेळी आयआयटीच्या तज्ज्ञांमार्फत सतत खचणाऱ्या डेंजर झोनची कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याची भाषा राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागामार्फत करण्यात आली आहे. मात्र, दरवर्षीप्रमाणे यंदाही हा डेंजर झोन खचत असून आज लगतच्या डोंगरातून मोठ्या दगडासह दरडही कोसळल्याने याठिकाणी भेटी देऊन आदेश देणाऱ्यांचा फोलपणा उघड झाला आहे.

# प्रारंभिक इशारा गरजेचा

भारताने नुकताच आपला ७९वा स्वातंत्र्यदिन दिमाखात साजरा केला. या निमित्ताने काही गोष्टींची नोंद घेणे गरजेचे आहे. अवकाश संशोधनात भारतीय अवकाश संशोधन संस्थेने म्हणजे इस्रोने घेतलेली झेप, हवामानाचे अंदाज व्यक्त करण्यात भारतीय हवामान खात्याने केलेली प्रगती, आयआयटीएमकडून विकसित होत असलेले स्वदेशी मॉडेल्स आणि महाकाय सुपरकम्प्युटर या सर्व गोष्टींमुळे भारताने हवामान संशोधनाच्या क्षेत्रात जगाला मोठे योगदान दिले आहे. ही बाब भारतासाठी अभिमानाची व विशेष नोंद घ्यावी, अशी खचितच आहे. मात्र या पार्श्वभूमीवर एक अत्यंत महत्त्वाचा दुवा अजूनही कमकुवत आहे, असे दिसते. हा दुवा म्हणजे हिमालयीन भागात हवामानाबाबत प्रारंभिक पूर्वसूचना/इशारा प्रणालींचा (अर्ली वॉर्निंग सिस्टीम) असलेला अभाव. या अभावाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. भारतात गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटनांमुळे तर हा अभाव अधिकच अधोरेखित झाला आहे.या आठवड्यात जम्मू-काश्मीरमध्ये अचानक आलेल्या पुरामुळे ६० पेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि २०० जण अद्याप बेपत्ता आहेत. त्याआधी, ५ ऑगस्ट २०२५ रोजी उत्तरकाशीमध्ये मुसळधार पावसाने विध्वंस माजवला. काही तास अखंड कोसळलेल्या पावसामुळे क्षणात आलेल्या पुरात काही जणांनी जीव गमावला. अनेक जण त्यात बेपत्ता झाले, असंख्य घरे वाहून गेली, रस्ते आणि पूल खचले. या पुराने अतोनात नुकसान झाले. त्यासोबत चारधाम यात्राही थांबवावी लागली. या दोन्ही घटना पाहता या समस्येची तातडीची दखल घेण्याची आवश्यकता अधोरेखित होते. येथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. हिमालयाच्या परिसरात घडलेल्या या किरकोळ अशा स्वरूपाच्या घटना नाहीत. त्यांची व्याप्ती मोठी होती, त्यांची तीव्रता मोठी होती. या दुर्घटनांमुळे झालेले नुकसान डोळेझाक करण्याजोगे नाही. मुळात या अशा घटना आता अपवादात्मक राहिलेल्या नाहीत. हवामानात झालेल्या आणि सातत्याने होत असलेल्या बदलांमुळे अशा घटना वारंवार घडत आहेत. तापमानात वाढ होत असलेले वातावरण जास्त प्रमाणात ओलावा धारण करते, प्रत्येक एक अंश सेल्सिअस तापमानवाढीसोबत सुमारे सात टक्के इतके अधिक पाणीवाष्प हवेत साठते. हे प्रमाण डोंगराळ भागात जास्त प्रमाणात असते. जेव्हा हा पाणीबाष्प डोंगराळ प्रदेशावर अचानक कोसळतो, तेव्हा विध्वंसक अशा प्रकारची ढगफुटी होते आणि अतिशय तीव्र व रौद्र असा पूर येण्याची शक्यता बळावते. हवामानातील बदलांमुळे होणाऱ्या दुर्घटनांची तीव्रता कमी करण्याचा एक उपाय म्हणजे पूर्वतयारी. ही पूर्वतयारी केली तर काय घडणार आहे, याचा अंदाज आधीच यायला हवा. हवामान खात्याचे अंदाज बरेचदा अचूक ठरतात, हे खरे. पण फक्त अचूक अंदाजांनी जीव वाचत नाहीत, हे लक्षात ठेवायला हवे. आपत्ती तेव्हाच रोखता येते जेव्हा त्या संदर्भातील इशारे तातडीने लोकांपर्यंत पोहोचतात. त्यातून काही पावले टाकण्यासाठी हाती अवधी मिळतो. मैदानी भागात वाढणाऱ्या मोठ्या नद्यांसाठी भारतात जी पूर इशारा प्रणाली विकसित झाली आहे ती डोंगराळ भागासाठी पुरेशी नाही, हे माझे स्पष्ट मत आहे. हिमालयीन भागात धोका फक्त नद्यांच्या पाण्यामुळे असतो, असे नव्हे, तर चार-पाच विविध घटकांच्या एकत्रीकरणामुळे तो निर्माण होतो. अवचित येणारे पूर, अत्यंत स्थानिक पातळीवरील ढगफुटी, भूस्खलन आणि वितळणाऱ्या हिमनद्यांमुळे तयार झालेले अस्थिर जलाशय हे त्यातील काही घटक आहेत. 'ग्लेशियल लेक आउटबर्स्ट फ्लड्स' असे संबोधले जाणारे जे पूर असतात ते केवळ काही मिनिटांत लाखो घनमीटर पाणी व चिखल खाली सोडतात आणि पूर्ण खोरीच धुऊन नेतात. याबाबत प्रारंभिक इशारा न मिळणे ही धोरणात्मक दृष्टीने गंभीर उणीव आहे. लोकांच्या जीवितासाठी अपरिहार्य असलेली प्रारंभिक इशारा प्रणाली ही केवळ 'सुविधा' नाही, तर जीवनरक्षक साधन आहे, हे लक्षात घ्यायला हवे. दुर्दैवाने, आपल्याकडे अजूनही या बाबतीत गुंतवणूक व धोरणात्मक नियोजन कमी पडते आहे. हिमालयातील पूर हे फक्त निसर्गाचा कोप नाही, तर त्यास सामोरे जाण्याची आपली तयारी किती अपुरी आहे हे सांगणारा कठोर धडा आहे. यावर उपाय करणे शक्य आहे आणि ते अवघडही नाहीत. पावसाचे, नद्यांचे, जमिनीतील ओलाव्याचे आणि हिमनद्यांच्या सरोवरांचे वास्तववेळी परीक्षण करणाऱ्या सेन्सरचे जाळे उभारणे आवश्यक आहे. उच्च-निर्धारित हवामान मॉडेल्स व डॉपलर रडार्स वापरून ढगफुटी व अतिवृष्टीचे अधिक अचूक आणि स्थानिक अंदाज द्यावे लागतील. पण यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे हे इशारे वेगाने आणि लगेच समजतील, अशा भाषेत लोकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, मोबाइल लर्ट, एसएमएस, रेडिओ, गावोगावी बसवलेले सायरन्स आणि स्थानिक स्वयंसेवकांद्वारे ते पोचवता येतील. यासाठी लोकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले गेले पाहिजे; जेणेकरून इशारा मिळाल्यावर नेमके कोणते पाऊल उचलायचे ते त्यांना ठाऊक असेल. भारत सरकारने गेल्या वर्षी सुमारे १९० हिमनदी सरोवरे 'अत्यंत धोकादायक' म्हणून निश्चित केली. त्या ठिकाणी उच्च-तंत्रज्ञानयुक्त इशारा प्रणाली बसवण्याचे काम राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या पथकांकडून केले गेले. हवामान बदलामुळे हिमनद्या झपाट्याने वितळत आहेत, नवीन सरोवरे तयार होत आहेत. त्यामुळे अशा कामाची तातडी वाढली आहे. हे उपक्रम निश्चितच आश्वासक आहेत, पण त्याची व्याप्ती आणखी वाढवण्याची गरज आहे. काहीजण युक्तिवाद करतात, की अमेरिकेसारख्या प्रगत देशांतही - जिथे आधुनिक इशारा प्रणाली अस्तित्वात आहेत - कधी कधी महाभयंकर हानी होते. हे खरे आहे, पण त्यातून एक महत्त्वाचा धडा मिळतो. प्रणाली असूनही धोका पूर्णपणे टाळता येत नाही; मात्र त्या प्रणालीशिवाय तर हानी अनेक पटींनी वाढते. प्रारंभिक इशारा हा उपायाचा एक भाग आहे, तो उपायच नाही, असे म्हणणे चुकीचे ठरेल. उपायाची सर्वांत मूलभूत पायरी मात्र तीच आहे. आपल्याला आपत्तीनंतर केवळ मदत व पुनर्वसनात अडकून राहायचे नाही. त्यापूर्वीच जीव वाचवायचे आहेत. हिमालयात राहणाऱ्या समुदायाला सुरक्षित ठेवणे ही फक्त सरकारी जबाबदारी नाही; तर वैज्ञानिक, प्रशासकीय यंत्रणा आणि स्थानिक समुदाय यांच्यातील सामूहिक बांधिलकी आहे. काश्मीरपासून उत्तरकाशीपर्यंतचा पूर आपल्याला एक सांगावा देऊन गेला आहे. हवामान बदलाच्या काळात आपण निष्क्रिय राहून चालणार नाही, असा तो सांगावा आहे. प्रारंभिक इशारा प्रणाली ही चैन नाही, ती जीवनरक्षक ढाल आहे. ही ढाल तातडीने उभारली नाही, तर वारंवार शोकांतिका घडत राहतील. अशा शोकांतिकांना नशिबावर ढकलणे थांबवून विज्ञान, तंत्रज्ञान आणि सुजाण धोरण यांच्या मदतीने लोकांचे प्राण वाचवण्याची वेळ आलेली आहे. पूर टाळता येणार नाहीत, भूस्खलनाच्या घटना होतीलच, पण वेळेवर इशारा दिला आणि तयारी केली तर हजारो जीव वाचवता येऊ शकतील, हे लक्षात घ्यायला हवे.

# कापोली येथे संतसेना महाराज पुण्यतिथी उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । कापोली**



श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन विभागाच्या वतीने प्रतिवर्षी संतसेना महाराज पुण्यतिथी साजरी केली जाते. त्याप्रमाणे श्री चंद्रकांत गायकवाड यांच्या निवासस्थानी मोठ्या उत्साहात संतसेना महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली. संतसेना महाराज हे एक मराठी वारकरी संत असून त्यांना ज्ञानदेव-नामदेवांच्या परिवारातील मानले जाते.

मध्यप्रदेशातील बांधवगडमध्ये जन्मलेल्या सेना महाराजांचा मूळ व्यवसाय नाभिकाचा होता. घरात बादशाहाची हजामत करण्याचा मान आपले कर्तव्य पार पाडताना सेना महाराजांचे मन मात्र देवपूजेत रमलेले असायचे. अशी एक गोष्ट सांगतात की, एकदा बादशाहाने त्यांना हजामतीला बोलावले होते. तेंव्हा संतसेना महाराज पूजेत रममाण झालेले होते. तेव्हा बादशाहा चिडला आणि त्याने संतसेना महाराजांना पकडण्याचे आदेश दिले. तेव्हा प्रत्यक्ष विठ्ठलाने बादशाहाची हजामत केली आणि सेना महाराजांना वाचविले होते. देव आणि भक्त यातील नाते अधोरेखित करण्यासाठी मांडलेल्या या कथेतील भावार्थ समजून घेण्यासारखा आहे.

संतसेना महाराजांनी आपल्या अभंगातूनही याच भक्तिरसाची उपासना केलेली आढळते. एका हिंदी भाषिक संतांची मराठी भक्तिरचना वाचताना महाराष्ट्रातील भक्तांना जरासुद्धा वेगळेपण जाणवत नाही. ज्ञानेश्वर तुकारामा इतकेच संत सेना महाराजांना श्रेष्ठ मानले जाते. संत सेना महाराजांचे अभंग मोठया आवडीने आजतागायत गायले जात आहेत. संतांना प्रदेश, भाषा, जातपात यांच्या मर्यादा नसतात हेच यावरून सिद्ध होते.

अतिशय उच्च विचारसरणी व पंढरीनाथावर निष्ठा असणारे हरिभक्त संत सेना महाराज जन्मले महाराष्ट्राबाहेर व घडले महाराष्ट्रीय संताच्या सहवासात, अशी त्याची जीवन यात्रा अखेर पर्यंत चालू राहिली. बऱ्याच दिवसानंतर ते जन्मभूमीकडे सर्वाचा निरोप घेऊन जायला निघाले. असे आख्यायिकेनुसार म्हटलं जाते.त्याच संतसेना महाराजांची महाराष्ट्रातील नाभिक संघाच्या वतीने आठवण म्हणून पुण्यतिथी साजरी केली जाते. तोच औचित्य साधून कापोली येथे चंद्रकांत गायकवाड यांच्या निवासस्थानी बोर्ली पंचतन विभागाच्या वतीने श्री संत सेनेची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.त्या कार्यक्रमात महिला व पुरुषांची उपस्थिती होती. ग्रंथांचे वाचन सुनील पवार व दीपक दिवेकर यांनी करुन अर्थ गजानन इंदुरकर यांनी केले. विश्वस्त अनिल पवार यांची उपस्थितीत अध्यक्ष विवेक कदम उपाध्यक्ष दिलीप कदम सेक्रेटरी प्रदीप शिंदे व कार्यकारणीतील सदस्य अक्षय चव्हाण,रणजीत भोसले यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम सांगता केली.

# महाड लायन्स क्लब यांच्यावतीने चिंभावे प्राथमिक आरोग्य केंद्रास पिण्याच्या पाण्याचे वॉटर फिल्टर भेट


**दै.रायगड नगरी । महाड**

महाड तालुक्यातील चिंभावे. प्राथमिक आरोग्य केंद्रात रोजच रुग्णांची गर्दी उसळलेली असते त्यांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून महा लायन्स क्लब यांच्या विद्यमाने व महाडचे समाजसेवक बाबूलाल जैन यांच्या मार्गदर्शनाने चिंभावे प्राथमिक आरोग्य केंद्रास पिण्याच्या पाण्याचे वॉटर फिल्टर सप्रेम भेट देण्यात आले.




हा कार्यक्रम रविवार दिनांक १७ ८ २०२५ रोजी चिंभावे. प्राथमिक आरोग्य केंद्रात मोठ्या आनंदोत्सवने साजरा करण्यात आला या वॉटर फिल्टर चे उद्घाटन चिंभावे ग्रामपंचायतचे सरपंच विक्रम मालप व समाजसेवक बाबूलाल जैन यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी दीपक हाटे, स्नेहा बुटाला, अमित मालप, विनय जोगदंड आदी मान्यवर उपस्थित होते.

# मा.स्व.पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती साजरी



**दै.रायगड नगरी । कर्जत**

आज दि. २० ऑगस्ट रोजी कर्जत शहर काँग्रेस तर्फे माजी स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती साजरी करून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली, महाराष्ट्र प्रदेश प्रतिनिधी मुकेश सुर्वे, शहर अध्यक्ष अनंत देवळे तसेच युवानेते ड.सूरज पंडीत, संतोष सुरवसे, राजू पवार यांनी सम योचीत भाषणे केली.

# सोमवारी आ.प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेची महाअंतिम फेरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**




विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, वक्तृत्वकौशल्य व नेतृत्वगुण विकसित व्हावेत या उद्देशाने पनवेल महानगरपालिका आणि कोशिश फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेची महाअंतिम फेरी सोमवार दिनांक २५ ऑगस्ट रोजी सकाळी ९. ३० वाजता खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात आयोजित करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी निर्भीडपणे व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ मिळवून देणे ही काळाची गरज होती. त्या नुसार विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणाला प्रोत्साहन देण्यासाठी कोशिश फाउंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेत वर्ग आणि शाळा अंतर्गत फेरीत उत्तम तयारीसह विचार मांडले. त्यामुळे हि स्पर्धा विद्यार्थ्यांना नेतृत्व करण्याची उत्तम संधी मिळाली. वर्ग आणि शाळा अंतर्गत फेरीत विद्यार्थ्यांनी सादर केलेले विषय अतिशय वैविध्यपूर्ण आणि महत्वपूर्ण होते. प्रत्येक भाषणात त्यांच्या कल्पकतेचा आणि विचारशक्तीचा सुंदर आविष्कार दिसून आला. त्या अनुषंगाने हि वक्तृत्व स्पर्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत आहे.

स्पर्धेत लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल कामोठे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे, चांगु काना ठाकूर विद्यालय नवीन पनवेल (इंग्रजी माध्यम), चांगु काना ठाकूर विद्यालय नवीन पन-वेल (मराठी माध्यम), सुषमा पाटील विद्यालय कामोठे, लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय कामोठे, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुर्बी, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खारघर, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोपरा, केएसए बार्न्स स्कूल, पनवेल महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. ०१ ते ११ शाळा आदी शाळांचा सहभाग मिळाला. स्पर्धेच्या पहिल्या फेरीत एकूण १६,८८७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि ४०५ वर्गांमधून निवड झालेल्या २०२५ विद्यार्थी शाळा अंतर्गत फेरीसाठी अर्थात दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले. यामधून पात्र ठरलेले विद्यार्थी सोमवारी होणाऱ्या महाअंतिम फेरीत आपले वक्तृत्व कौशल्य सादर करणार आहेत.

# कोतवाल बुद्रुकच्या कालकाई माता सेवा संस्थेतर्फे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क रकमेचे धनादेश वाटप



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

कालकाई माता सेवा संस्था कोतवाल बुद्रुक या सामाजिक, शैक्षणिक, क्षेत्रात गेली आठ वर्ष कार्यरत नोंदणीकृत संस्थेच्या ध्येय धोरणानुसार पोलादपूर तालुक्यातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या आर्थिक विवंचनेतुन ते शैक्षणिक प्रवाहातुन बाहेर जाऊ नयेत यासाठी सामाजिक दायित्व म्हणून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क भरण्याचे महत्वपूर्ण कार्य केले जात आहे.

कालकाई माता सेवा संस्था कोतवाल बुद्रुक या संस्थेने माऊली प्रशाला कोतवाल १५ विद्यार्थी, न्यू इंग्लिश विद्यालय ओंबळी २५ विद्यार्थी, न्यू इंग्लिश विद्यालय पैठण २८ विद्यार्थी, विद्यामंदिर पोलादपूर २८ विद्यार्थी, प्रभावती रामचंद्र शेठ विद्यालय पोलादपूर २७ विद्यार्थी, नरवीर तानाजी मालुसरे विद्यालय देवळे ११ विद्यार्थी, स्व.शांताराम शंकर जाधव न्यु इंग्लिश स्कूल पळचिल १८ विद्यार्थी, श्री. शंकरराव महाडिक इंग्लिश विद्यालय १० विद्यार्थी अशी विद्यालय निहाय विद्यार्थी संख्येची शैक्षणिक शुल्क धनादेशाने अदा केली.

यामध्ये प्रामुख्याने संस्थेचे विनय नायर आणि मित्र परिवार, पंखुडी कुमारी तसेच अभिजित जाधव यांचे सहकारी यांनी मोलाचे सहकार्य केले. सदर मदतीचा धनादेश शाळांकडे सुपुर्द करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष महेश दरेकर, कोतवाल बुद्रुकच्या सरपंच रेखा अनंत दळवी, प्रितीश दरेकर, पत्रकार शिवराज पार्टे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, सभासद, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिनी तळा तालुक्यातील शिंदे कडून शेलु येथील विद्यार्थाना शैक्षणिक साहित्य

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील मांदाड येथील प्राथमिक शाळेत जाधव गरूजी यांच्या वर्गात शिक्षणा बरोबरच गरीबांना मदत करण्याचे धडे घेतलेल्या शिंदे यांनी मुंबई येथून येवून सुनील जाधव शिक्षक असलेल्या कर्जत तालुक्यातील शेलु येथील प्राथमिक शाळेत जावून गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप सुरज शिंदे या युवकाने केले.

तसेच शेलु येथील शाळेत झेंडा वंदन करुन विद्यार्थी यांच्या समवेत प्रभातफेरी व मनोरंजन कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. त्यांच्या या गरीबांची सेवा करण्याच्या अस्तेचा शेलु मध्ये चर्चा करण्याचा विषय होवून शिंदे यांना ग्रामस्थ धन्यवाद देत आहेत.



# रांजणपाडा येथे जय हनुमान नाच मंडळाची गौरी गणपतीच्या बाल्या नृत्याची तयारी

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र राज्याला लोककलेची परंपरा लाभली असून, ही लोककला जपण्याचा प्रयत्न प्रामुख्याने उरण तालुक्यात केला जात आहे. सांस्कृतिक वारसा लाभलेल्या उरण तालुक्यातील रांजणपाडा या गावात १८ ऑगस्ट रोजी जय हनुमान नाच मंडळाच्या वतीने बाल्या नृत्याच्या सरावाचे उद्घाटन करण्यात आले. भाद्रपद महिन्यात गौरी गणपतीच्या उत्सवासाठी तसेच नवरात्रीसाठी या मंडळाकडून तालुक्यात अनेक ठिकाणी बाल्या नृत्याचे कार्यक्रम होत असतात. मागील पंचवीस वर्षाची परंपरा या नाच मंडळाला असून या नाच मंडळाच्या स्थापनेच्या सुरुवातीचे गायक हे गव्हाणकोपरचे स्वर्गीय अमृत बुवा मोकल होते.



त्यांनीच या नाच मंडळाला योग्य मार्गदर्शन केले आहे. त्यानंतर उरण महालण विभागातील डोंगरी गावचे कवी गायक भालचंद्र घरत यांचाही या नाच मंडळाला मोठा आधार लाभला होता. त्यांनीही या नाच मंडळाला मोठे सहकार्य केले असल्याची माहिती उद्घाटन प्रसंगी देण्यात आली. उद्घाटन प्रसंगी ज्येष्ठ नागरिक रमेश पाटील, नाटककार हसूराम पाटील, रमाकांत म्हात्रे, अनंत पाटील, रमेश म्हात्रे, राजेश ठाकूर, सुदर्शन पाटील, अलंकार कडू ,प्रवीण नाईक, पांडुरंग पाटील, गुरुनाथ म्हात्रे ,चंद्रकांत पाटील, विलास पाटील ,अंकुश ठाकूर तसेच गावातील अन्य नागरिक उपस्थित होते.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री आणि पनवेल महापालिकेच्यावतीने वृक्षारोपण अभियान संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री आणि पनवेल महापालिकेच्यावतीने वृक्षारोपण अभियान राबवले जात आहे. त्यापार्श्वभुमीवर विचुंबे रोडवर वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याहस्ते वृक्षारोपण करण्यात आले असून त्यांनी यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री आणि पनवेल महापालिकेच्यावतीने निसर्ग समृद्ध करणारे अभियान राबवल जात असल्याबद्दल त्यांचे आभार मानून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रीचे रायगड अध्यक्ष तथा माजी नगरसेवक अरविंद सावळेकर, संस्थापक अध्यक्ष राजेश प्रजापती, माजी अध्यक्ष महेश नागराजन, प्रोजेक्ट चेअरमन जयेश गांधी, उपाध्यक्ष हितेश गढिया, वैभव अग्रवाल खजिनदार प्रिया गुरूनानी, जॉइंट सेक्रेटरी प्रशांत शेवडे, पीआरओ लक्ष्मण साळुंखे, यूथ अध्यक्ष जितेश अग्रवाल, कार्यकारिणी सदस्य अनिरूद्ध सावळेकर, प्रतिक पोटे यांच्यासह पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक ॲडव्होकेट मनोज भुजबळ, तेजस कांडपीळे, प्रभाकर बहिरा, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, किशोर सुरते, पनवेल महापलिकेचे उपायुक्त वैभव विधाते आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री रायगड असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रसिध्द निवेदक महेश गाडगीळ यांनी केले.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# गोरेगाव विभागातील वर्षावास मालिकेचे पाचवे प्रवचन मंगरूळ येथे मोठ्या उत्साहात

**दै.रायगड नगरी । वावेदिवाळी इंदापूर**

पंचशील बौद्धजन सेवा संघ गोरेगाव विभाग व बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रं ८४२, पंचशील महिला सेवा संघ गोरेगाव विभाग यांचे संयुक्त विद्यमाने दरवर्षी बौद्ध धम्म वर्षावास मालिकेचे नियोजन करण्यात आले आहे. या संघाचे नेतृत्व विकास गायकवाड, चंद्रमणी साळवी, सौ.सुप्रिया साळवी करीत आहेत. या निमित्त बत्तिशी विभागातील अनेक गावात जाऊन धम्म प्रचार मालिका राबविली जात आहे. दिनांक १६ ऑगस्ट २०२५' रोजी मंगरूळ येथील इतिहासी विहारात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असताना या वर्षावास मालिकेचे पाचवे पुष्प दि बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया व अखिल भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष संतोष जाधव यांनी भारताच्या स्वतंत्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान या विषयावर सविस्तर व समर्पक विश्लेषण करीत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकराने यांदेशाती गरीब जनतेचा विचार करून ब्रिटिशाने घेतलेल्या तीन गोलमेज परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेली भूमिका ब्रिटिशाने मान्य केली.

ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून भारत मुक्त होईल परंतु या देशात चातुरवर्ण मनुवादी जातीय व्यवस्थेत गुलामगिरीचे जीवांजगत असलेल्या शूद्र व अतिशूद्र यांना भारतीय स्वातंत्र्यासोबत जगण्याचे स्वतंत्र मिळाले पाहिजे याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकच वेळी ब्रिटिशांच्या विरोधात स्वातंत्र्य लढा दिला आणि व स्वकीय्यांच्या विरोधात सामाजिक समतेचा लढा दिला. प्रबोधनकार संतोष जाधाव यांनी वामन कर्डक यांच्या गीताचा आधार घेत हसत खेळत अनेक उदाहरण देऊन त्यांनी सोप्या भाषेत धम्म समजावून सांगितला. वर्षावास मालिकेच्या



नियोजन सचिव संदीप साळवी यांनी केले.कार्यक्रमाचे मागरूळ गावचे स्थानिक व मुंबई समितीने कार्यक्रमाची जय्यत तयारी केली आयु.निखिल लोखंडे व राजरत्न लोखंडे यांनी सूत्रसंचालन केले संतोष लोखंडे यांनी मार्गदर्शन केले.प्रमोद लोखंडे, दिनेश लोखंडे, महेन्द्र लोखंडे रवींद्र लोखंडे, पांडुरंग लोखंडे, श्रीकांत लोखंडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. महिला सेवा संघाच्या सौ.अपर्णा लोखंडे, सुवर्णा लोखंडे, रंजना लोखंडे, प्रिया लोखडे, मृणाली लोखंडे,गोरेगाव विभागातील ३२ गावात वर्षावास निमित्त मोठ्या प्रमाणात धम्मप्रचार होत आहे. महिलांमध्ये प्रचंड उत्साह असून सुमारे १५० महिला उपस्थित नेहमीच असतात. तसेच १०० पुरुष नेहमीच उपस्थित असतात. यातून सामाजिक जनजागृती होत आहे. कार्यक्रमात इतर धर्मीय लोक देखील सहभाग घेतात ही आनंदाची बाब आहे.

बौद्धजन पंचायत समिती खजिनदार बळीराम हाटे सर्व महिलांव पुरुष उपस्थित होते तसेच बत्तिशीमधील पंचशील बौद्धजन सेवा संघाचे उपासक व उपासिका मोठ्या संखेने हजार होते.या कार्यक्रमाला विभागातील ज्येष्ठ समाजसेवक बळीराम हाटे, तुकाराम लोखंडे, हिरामण महाडिक, शरद मोरे, सुरेश जाधव, विजय जाधव, अनंत लोखंडे, सुरेश अहिरे, दिनेश लोखंडे, मुंबई कार्याध्यक्ष मुकुंद पवार, शाखा क्र. २ चे सचिव निलेश महाडिक, रमेश लोखंडे उपस्थित होते. महिला संघाच्या संघटक सौ. रेश्मा संदीप साळवी, रेश्मा रमेश साळवी, सुनंदा मोरे, जयश्रीताई सोनवणे, मांगरुल येथील अपर्णा अनंत लोखंडे, विद्या लोखंडे, राजश्री लोखंडे, रोहित राजेंद्र लोखंडे, मृणाली लोखंडे, कल्पना लोखंडे, विशाखा लोखंडे, मृणाल लोखंडे यांनी कार्यक्रमाची तयारी केली.कार्यक्रमाचे अध्यक्ष विकासदादा गायकवाड यांनी मार्गदर्शन करताना मंगरूळ गाव बत्तिशी विभागात एक नंबर आल्याचे सांगताना गावातील विविध उपक्रमाची माहिती दिली. शासन पुरस्कार प्राप्त बौद्धवाडी आल्याचे सांगितले. बौद्धजन पंचायत समितीचे अध्यक्ष आयु. चंद्रमणी साळवी हे प्रबोधनकार आयु. संतोष जाधव यांच्या संपर्कात आल्याने या गोरेगाव विभागात वर्षावास सुरू झाला आणि महिलांचे संघटन झाल्याने विभागात मोठ्या प्रमाणात धम्म प्रचार व मैत्रीभाव निर्माण झाला.

# मुरुडमध्ये पावसाचे थैमान

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

पाचव्या दिवशीही मुरुडसह नांदगाव, मजगांव, बोर्ली, -मांडला, आगरदांडा, राजपुरी, डोंगरी, एकदरा परी-सरात वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला.पावसाचा जोर कायम असून आज सकाळपर्यंत ११३ मि.मी.पाऊस झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

गेल्या चार पाच दिवसांपासून वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडत आहे. पुढील ३ तासांत रायगड, मुंबई शहर व मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम ते जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तरी नागरिकांनी सतर्क राहावे. असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. मुरुड मध्ये आज सकाळ पर्यंत ११३ मि.मी. इतका पाऊस झाला असून आतापर्यंत १८७७ मि.मी. पाऊस झाला आहे. काही रस्त्यावर पाणी साचल्याने नागरिकांना त्रास होत होता तर बाजारपेठेत गटारे भरली, पाणी रस्त्यावर आले याचा वृत्तपत्र विक्रेत्याना फटका बसला.

# रायगड जिल्हांतर्गत बास्केटबॉल स्पर्धा व जिल्हा बास्केटबॉल निवड चाचणीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगड यांच्या वतीने १३ वर्षाखालील मुले व मुली यांच्यासाठी रायगड जिल्हांतर्गत बास्केटबॉल स्पर्धा व जिल्हा निवड चाचणीचे आयोजन मुलांकरिता शनिवार २३ ऑगस्ट २०२५ व मुलीं करिता रविवार, दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजता विबग्योर शाळा ,सेक्टर १५ , खारघर येथे करण्यात येत आहे.

या निवड चाचणीतून निवडलेला संघ दिनांक ११ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०२५ दरम्यान सोलापूर, येथे आयोजित होणाऱ्या १३ वर्षाखालील महाराष्ट्र राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करेल. रायगड जिल्ह्यातील सर्व बास्केटबॉल खेळाडूंना या निवड चाचणीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. खेळाडूंनी निवड चाचणीसाठी येताना दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, वयाचा पुरावा (जन्म प्रमाणपत्र) आणि निव-ासाचा पुरावा (आधार कार्ड किंवा समकक्ष कागदपत्र) सोबत आणणे बंधनकारक आहे. रायगड जिल्ह्यातील बास्केटबॉल प्रेमींसाठी ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे की, बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगड यांच्या वतीने १३ वर्षाखालील मुला-मुलींसाठी जिल्हास्तरीय स्पर्धा व निवड चाचणीचे आयोजन खारघर येथे करण्यात येत आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील प्रतिभावान खेळाडूंना स्वतःला सिद्ध करण्याची व पुढे राज्यस्तरावर चमक दाखविण्याची संधी मिळणार आहे. सर्व युवा खेळाडूंनी या स्पर्धेत उत्साहाने सहभाग घ्यावा, असे आ-वाहन आमदार विक्रांत दादा पाटील उपाध्यक्ष, महाराष्ट्र बास्केटबॉल संघटना अध्यक्ष, बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी खेळाडूंनी मंदार म्हात्रे (+९१ ८८५०८ ००२९९) व आकाश चाकणे (संपर्क: ९०२९५९६९४९) यांच्याशी संपर्क साधावा.

# पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या मार्फत दंगा काबू योजनेची रंगीत तालीम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आगामी गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद सण-उत्सवाचे अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत आज पाडा मोहल्ला मस्जिद मुसलमान नाका पनवेल या ठिकाणी दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली.

सदर दंगा काबू योजनेत पनवेल शहर पोलीस ठाणे कडील वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली २ पोनि, ७ सपोनि, पोउपनि, ४२ अंमलदार, बीट मार्शल १,२,३ वरील अंमलदार, मोबाईल १ वरील अंमलदार, डीपी पथकाकडील ६ अंमलदार, झोन ३ स्ट्राइकिंगसह १ अधिकारी ०९ अंमलदार, फायर बिग्रेड गाडीसह ०१ अधिकारी ०५ अंमलदार, पनवेल मनपा कडील २ रुग्णवाहिका स्टाफ सह हजर होते.

नमूद दंगा काबू योजना संपल्यानंतर पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील भारत नगर, कोळीवाडा परिसरात कोंबिंग ऑपरेशन सुरू करण्यात आले. तसेच टपाल नाका, आदिल टॉवर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, उरण नाका या ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली होती.



# ऑनलाइन फसवणुकीत साडेसहा लाखांचा गंडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका व्यावसायिकाला तब्बल ६ लाख ५० हजार रुपयांना गंडा घालण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमित वर्मा हे लॉजिस्टिक्स व्यवसायाशी संबंधित असून ते ग्रीनफिल्ड रॉयल सीएचएस, कामोठे येथे वास्तव्यास आहेत. वर्मा यांना अनोळखी व्यक्तीकडून ग्राहक केअर प्रतिनिधी असल्याचे भासवून संपर्क साधला गेला. फसवणूक करणाऱ्यांनी एक एपीके फाइल पाठवली. ती मोबाइलमध्ये इन्स्टॉल केल्यावर फसवणूक करणाऱ्यांना त्यांच्या मोबाइल व बँक खात्याची माहिती मिळाली. त्यानंतर तत्काळ ६.५ लाख रुपये ऑनलाइन पद्धतीने त्यांच्या बँक खात्यातून वळते झाले. ही फसवणूक लक्षात येताच वर्मा यांनी तातडीने कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.

पोलिसांनी तत्काळ तपास सुरू करून अज्ञात आरोपीविरुद्ध माहिती तंत्रज्ञान अधिनियम व भारतीय दंड संहितेतील कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे करत आहेत.

# शिवसेना (उबाठा) पक्षाचे शिवसैनिक गेले अपघातग्रस्तांच्या मदतीला धावून

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील कळंबोली सर्कल ते टी पॉईंट येथे रस्त्यात मोठा खड्डा पडला होता त्यामुळे कमीत कमी १ तास मध्ये ७ ते ८ बाईक वाले आपल्या कुटूंब सहीत पडले होते अशी माहिती मिळताच शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे शिवसैनिक अपघातग्रस्तांच्या मदतीला धावून गेले .

यावेळी कामोठे शिवसेना शहर संघटक कामोठे संतोष गोळे व उप शहर प्रमुख कामोठे गणेश खांडगे,व रवी रचना बिल्डींग मधील सचिन किंतुकले तसेच इतर नागरिकांनी त्यानी ठिकाणी पोहोचून स्थानिक पोलिस व वाहतूक शाखेशी संपर्क साधून त्याठिकाणी बेरिकेट लावले आणि जे बाईक वरून अपघात झाले होते त्यामधील काही नागरिकांशी एमजीएम व कळंबोली मधील सिद्धिविनायक हॉस्पिटल येथे जाऊन रुग्णाशी संवाद साधला. शिवसैनिकांच्या सतर्कतेमुळे अनेकांचे जीव बचावले आहेत.

# पनवेल महानगरपालिकेच्या वतीने ज्येष्ठ नागरिक दिन-कृतज्ञता संवाददिनच्या आयोजनात बदल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेमार्फत येत्या २१ ऑगस्टला गुरुवारी ज्येष्ठ नागरिक दिन -कृतज्ञता संवाद चे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते.

परंतु अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर दिनांक २१ रोजी म्हणजे आज होणारे कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. लवकरच या कार्यक्रमाची पुढील तारीख जाहीर करण्यात येणार असल्याचे महापालिकेच्यावतीने सांगण्यात आले आहे.

**पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग**

**लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय, आगरी समाज हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल ४१० २०६**

Email-msbpanyel1993@gmail.com Email : panvelcorporation@gmail.com

**जाहिर सूचना**

पनवेल महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील इयत्ता ७ वी च्या एकूण २९३ विद्यार्थ्यांना एलिमेंटरी इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षेसाठी चित्रकला किट उपलब्ध करुन द्यावयाची आहेत. याकामी इच्छुकांनी निविदा दर दि. २१.०८.२०२५ ते दि.२९.०८.२०२५ रोजी सायं. ३.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे सादर करावीत. सदर चित्रकला किटमधील साहित्याची सविस्तर यादी शिक्षण विभागाच्या कार्यालयात व पनवेल महानगरपालिकेच्या सांकेतिकस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
**रुपाली गणपत माने**
**सहा.आयुक्त (शिक्षण)**
**पनवेल महानगरपालिका**

**म्हसळा नगरपंचायत म्हसळा**
**ऑफ लाईन दरपत्रक सुचना २०२५-२६**

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची मुदत |
|---|---|---|
| १ | म्हसळा नगरपंचायत कायम आस्थापनेवरील कर्मचारी यांना गणवेश, रेनकोट, छत्री खरेदी करण्याकामी अधिकृत विक्रेत्यांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत (गणवेश - महिला, रेनकोट पुरुष/महिला, छत्री महिला) | १५ दिवस |

दरपत्रक जमा करणे दि. २१/०८/२०२५ ते दि. २५/०८/२०२५ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत
जा.क्र ९२५ म्हनप/२०२५-२६
म्हसळा नगरपंचायत कार्यालय, म्हसळा, जिल्हा - रायगड, दिनांक: २०/०८/२०२५

सही/-
मुख्याधिकारी
म्हसळा नगर पंचायत

**गाळा विकणे आहे**

**नवीन कोर्टा समोर दुकानी (शॉप) ६५० स्के फुट गाळा विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा.**

**9892181383**

**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : देवीचापाडा, तालुका - पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिंच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन-**
**मौजे : देवीचापाडा, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| महादेव रामा फडके<br>ज्ञानदेव रामा फडके | ३/६ | ०-०४-००<br>पोटखराबा ०-००-८०<br>एकूण क्षेत्र ०-०४-८० | ०.६२ |
| | २ | ०-०६-००<br>पैकी ०-०१-८० | ०.०९ |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, कुळ हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तक्रारी दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २०/०८/२०२५

सही/-
**ॲड.शेखर ज. खोपकर**
**९८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**
**मो.नं. ८६५५१ ५८७८१**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमच्या अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

**मौजे - लोधीवली, ता.-खालापुर, जि. रायगड येथील मिळकत**

| कब्जेदाराचे नाव | गट नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| अमजद अझीझ मेहेवख्श | ८४/क/१ | ३६-००-०० | ७२०.०० |
| | १०२/२ | १-५०-६० | ३१.२६ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आणि बोजारहित व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व तमाम जनतेस कळावे.

दिनांक : २०/०८/२०२५

सही/-
**ॲड.अपेक्षा दामोदर पाटील**
**भुमी लँडमार्क, ५०७, सेक्टर १७, प्लॉट नं ३४/३४ अ, क्रिया शोरुमच्या वरती, खांदा कॉलनी न्यु पनवेल-४१०२०६,**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे नितळस, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतीयोग्य जमिनीचे मालक श्रीमती शांताबाई भाऊ भोपी रा. मौजे नितळस, ता. पनवेल, जि. रायगड यांचे कडून आमचे अशिल यांनी मिळकतीतील अविभाज्य हिस्सा कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**- मिळकतीचे वर्णन-**
**मौजे : नितळस, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| मौजे | भुधारणा पद्धती | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र |
|---|---|---|---|
| नितळस, ता.पनवेल, जि.रायगड | वर्ग १ | ६ | जिरायत ०-७१-३०<br>पो.ख. ०-०३-८०<br>एकूण क्षेत्र ०-७५-१०<br>पैकी ०-२५-० |

तरी वरिल मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरिल मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २०/०८/२०२५

सही/-
**ॲड.शशिकांत काळू म्हात्रे**
**शॉप नं. ०३, नविन कोर्ट समोर, तळमजला, शितल सोसायटी, ता. पनवेल, जि. रायगड**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमच्या अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

**मौजे - लोधीवली, ता.-खालापुर, जि. रायगड येथील मिळकत**

| अ. क्र. | कब्जेदाराचे नाव | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | रमेश राजाराम भोईटे<br>पोपट तेजराव गांधी | ९२ | १ | ०-६१-६० | १०.९० |
| २ | हेमंत संपतराव मगर | ९२ | १ | ०-३०-०० | ६.१७ |
| | | | एकूण | ०-९१-६० | |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आणि बोजारहित व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व तमाम जनतेस कळावे.

दिनांक : २०/०८/२०२५

सही/-
**ॲड.अपेक्षा दामोदर पाटील**
**भुमी लँडमार्क, ५०७, सेक्टर १७, प्लॉट नं ३४/३४ अ, क्रिया शोरुमच्या वरती, खांदा कॉलनी न्यु पनवेल-४१०२०६,**

# प्रशासनाच्या दिरंगाईमुळे अखेरीस अतिवृष्टीमुळे मार्केटची भिंत कोसळली

**दै.रायगड नगरी । माथेरान**

राज्यात सर्वत्र पावसाने हाहाकार केला असून दुर्गम पर्यटनस्थळ माथेरान मध्ये सुध्दा पावसाने सलग चार दिवस आभाळफाड पर्जन्यवृष्टी केल्याने येथील काही ठिकाणी झाडांची पडझड त्याचप्रमाणे मुख्य बाजारपेठ मधील हेरिटेज कपाडिया मार्केटच्या दक्षिणेस असणारी भिंत कोसळली आहे याच भागात नागरिकांची नेहमीच मोठया प्रमाणात खरेदीसाठी वर्दळ असते.



सुदैवाने यावेळी काही हानी झाली नसली तरी सुद्धा या मार्केटच्या भागातील दुकानांना धोका निर्माण झाला आहे. ह्या धोकादायक भिंतीची तातडीने दुरुस्ती करून घ्यावी याबाबत येथील व्यापारी मुस्तफा माथेरानवाला यांनी यापूर्वीच संबंधित अधिकारी वर्गाच्या निदर्शनास आणून दिले होते की, याच भिंतीच्या वरील बाजूस एक झाड असून बाजूलाच विद्युत खांब आहे. ही भिंत पडल्यास हा खांब आणि झाड सुध्दा आपसूकच पडून मोठी हानी होण्याची शक्यता आहे. पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी मार्ग नाही पाईप लाईन रस्त्याखालून गेल्या आहेत त्यामुळेच सर्व पावसाळी पाणी रस्त्यावरून वाहते यासाठी लवकरच भिंतीची दुरुस्ती करून घ्यावी असे व्यापारी मुस्तफा माथेरान-वाला यांनी सूचित केले होते परंतु त्याकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी कानाडोळा केल्यामुळे आणि याबाबत वेळीच दखल न घेतल्यामुळे अखेरीस ही भिंत काल दुपारच्या दरम्यान कोसळली आहे.

यावेळी बोलताना मा.उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव म्हणाले की, मुख्य बाजारपेठ असल्याने दिवसभरात शेकडो नागरिकांची या भागात वहीवाट असते सदरच्या ठिकाणच्या भिंतीची दुरुस्ती करण्यात यावी अन्यथा मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे लेखी निवेदन मी स्वतः ८ जुलै २०२३ रोजी नगरपरिषद कार्यालयाला सादर केले होते परंतु सदरच्या भिंतीची दुरुस्ती तर दूरच मला या निवेदनाचे उत्तर देण्याची तसदी सुद्धा संबंधित विभागाकडून घेण्यात आली नाही.मी केलेल्या लेखी सूचनेची स्थानिक प्रशासनाने वेळीच दखल घेतली असती तर कदाचित ही परिस्थिती उद्भवली नसती. असो आता जोपर्यंत पाऊस ओसरत नाही तोपर्यंत या भिंतीचे काम करणे शक्य नाही परंतु संबंधित विभागाने अशा गोष्टी वेळीच गांभीर्याने घेऊन काही आवश्यक कामांची अंमलबजावणी करावी तसेच सदरील ठिकाणची ही भिंत लवकरात लवकर दुरुस्त करावी.

# संततधार पावसाने म्हसळा पांगलोळी येथील शेतकऱ्याचा गुरांचा गोठा जमीनदोस्त

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात पडत असलेल्या धुव्वाधार पावसाने तालुक्यात शहरासह ग्रामीण भागात पक्के घरांचे व कच्च्या घरांची अंशतः पडझड, संरक्षण भिंत व शेतीचे बांधबंदिस्तीची पडझड सुरु असुन दिनांक १९ रोजी रात्री धुव्वाधार पावसात मौजे पांगलोळी येथील शेतकरी गणू धर्माजी मांढरे यांचा गुरांचा गोठा जमीनदोस्त झाला असल्याचे सांगण्यात आले. तसेच पानवे बौध्दवाडी येथे पाणी साठवण टाकी भिंत बांधकाम कोसळले आहे.

दिनांक १६ ते २० ऑगस्ट पासून पडत असलेल्या पावसात म्हसळा तालुक्यात १६ पक्के घरांची अंशतः तर ८ कच्च्या घरांची पडझड होऊन नुकसान झाले आहे. तीन ठिकाणी संरक्षण भिंत बांधकाम कोसळले आहे. एका ठिकाणी शेतीचे बांध फुटले असल्याची नोंद म्हसळा महसूल विभागात नोंद केली असल्याची माहिती महसूल विभाग अधिकारी महेश रणदिवे यांनी माहिती देताना सांगितले.

अतिवृष्टीत झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा असे आदेश श्रीवर्धन मतदार संघाच्या आमदार तथा राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी म्हसळा तहसिल कार्यालयाला दिले असता तहसीलदार सचिन खाडे यांनी नुकसानग्रस्त ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी केली असल्याचे सांगण्यात आले.



# म्हाडा ग्रामस्थांच्या आक्रमक भूमिकेसमोर प्रशासन नरमले, अनधिकृत टपऱ्या जमीनदोस्त

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा नगरपरिषद हद्दीतील म्हाडा वसा-हती समोरील वादादित टपऱ्या अखेर बुधवारी जमीनदोस्त केल्या. पोलिसांच्या संरक्षणात सार्व. बांधकाम विभागाने ही कारवाई केली. म्हाडा वसाहतीचे शेकडो रहिवासी अक्षरशः रस्त्यावर उतरले. उपोषणाच्या ईशाऱ्यानंतर संबंधीत प्रशासनाला जाग आली आणि टपऱ्या हटविण्याची कारवाई झाली.



म्हाडा वसाहती ग्रामस्थ, महिलांच्या आक्रमक भूमिकेसमोर सार्व. बांधकाम प्रशासन अक्षरशः नरमले. मागील दीडदोन महिन्यांपासून अनाधिकृत टपऱ्या हटवण्यासाठी ग्रामस्थांनी सर्वच प्रशासनाच्या दारी पायपीट केली. मात्र सार्व. बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी वारंवार दुर्लक्ष केले. दुसऱ्यांची जबाबदारी म्हणत टोलवाटोलवी केली. यातून ग्रामस्थांची सहजनशीलता संपली. अखेर संबंधीत प्रशासन विरोधात ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेत बुधवारी साखळी उपोषणाचा ईशारा दिला. सर्वच स्तरातून हा अनाधिकृत टपऱ्यांचा मुद्दा लावून धरला गेला. त्याच घडामोडींचा धसका घेत अनाधिकृत टपऱ्या हटवण्यासाठी सार्व. बांधकाम प्रशासन पुढे सरसावले, टपऱ्या जमीनदोस्त करण्यात आल्याची घटना घडली,

दरम्यान, सार्व बांधकाम विभागाने म्हाडा वसाहती समोरील अनधिकृत टपऱ्या हटवण्याची मोहीम हाती घेतली. तसेच धाटाव, रोठ ग्रामपंचायत हद्दीतील कंपन्या रस्तालगत अनाधिकृत टपऱ्या हटविण्यासाठी बांधकाम विभाग धाडस दाखवील का ? असा सवाल उपस्थित झाला तर म्हाडा समोरील त्रासदायक ठरणाऱ्या अनाधिकृत टपऱ्या हटविण्यात आल्याने ग्रामस्थांच्या एकजुटीचा विजय झाला, म्हाडा वसाहतीने बुधवारी मोकळा श्वास घेतला असेच दृश्य समोर आले आहे.

म्हाडा वसाहती समोरील अतिक्रमण टपऱ्या हटाव मोहिमेला बुधवारी यश आले. ग्रामस्थांनी उपोषणाचा इशारा दिल्यानंतर सार्व. बांधकाम विभागाने अनाधिकृत टपऱ्या हटवाची मोहीम हाती घेऊन फत्ते केली. कायदा बचाव, अतिक्रमण हटाव, कोण म्हणतोय हटणार नाय, हटविल्याशिवाय राहणार नाय.. अशा घोषणा उपस्थित शेकडो म्हाडा वसाहत ग्रामस्थांनी दिल्या. सार्व बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता विजय बागुल यांनी बुधवारी अतिक्रमण टपऱ्या हटविण्याचे स्पष्ट संकेत दिले होते. त्यानुसार अनाधिकृत टपऱ्या हटविण्यात आल्या. याठिकाणी म्हाडा वसा-हतीचे शेकडो पुरुष, महिला उपस्थित होत्या. जोपर्यंत अनाधिकृत टपऱ्या जमिनदोस्त करीत नाहीत, तोपर्यंत जागेवरून हटणार नाहीत, असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला. अनाधिकृत टपऱ्यांच्या भरावामुळे पावसाचे पाणी वसाहतीत येत होता. शालेय विद्यार्थी, नागरिकांना प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागत होते. आमचे सामाजिक स्वास्थ बिघडले. याबाबत संबंधीत प्रशासनाजवळ पत्रव्यवहार केला. पण कोणीच दखल घेतली नाही. अखेर आम्ही ग्रामस्थांनी उपोषणाचे हत्यार उपसले, पत्रकारांनी हा मुद्दा लावून धरला. टपऱ्यांमुळे रहदारीला धोका निर्माण झाला होता, आम्हा म्हाडा वसाहत, रस्ता मोकळा झाला, पूर्ण कारवाई होईपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थ भिमेश भेकरे यांनी दिली. दरम्यान, म्हाडा वसाहती ग्रामपंचायतच्या अनधिकृत टपऱ्या हटाव मोहिमेला यश आले. एकटतेचा विजय झाला. सार्व. बांधकाम विभागाने मोहीम फत्ते केली असेच बोलले जात आहे तर प्रांत, तहसील सार्व. बांधकाम विभाग, पत्रकार यांचे म्हाडा वसाहत ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले आहे.

# गणेशभक्तांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज होत आहे. मुंबई गोवा महामार्गावर २३ ऑगस्ट ते १० सप्टेंबर दरम्यान १० ठिकाणी आरोग्य विभागाचे पथक कार्यरत असणार आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ही पथके स्थापन करण्यात आली आहेत.

गणेशोत्सव २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान साजरा करण्यात येणार आहे. कोकणात घराघरात गणपती मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात येते. गणेशोत्सवासाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पालघर येथून मोठ्या प्रमाणात चाकरमानी आपापल्या गावी जाण्यासाठी मुंबई गोवा महामार्गावरून प्रवास करतात. यामुळे महामार्गावरील वर्दळीत मोठ्या प्रमाणात वाढ होते. वाढती वाहतूक लक्षात घेता अपघाताचीही शक्यता निर्माण होते तसेच प्रवाशांना केव्हाही वैद्यकीय गरज भासू शकते, हे लक्षात घेऊन आरोग्य विभाग सज्ज झाला आहे.

चाकरमानी शक्यतो २३ ऑगस्टपासून आपापल्या गावी जाण्यासाठी प्रवास करतील अशी शक्यता आहे. यामुळे २३ ऑगस्टपासून मुंबई गोवा महामार्गावर १० ठिकाणी आरोग्य पथक नेमण्यात येणार आहे. या आरोग्य पथकात दिवस रात्र १ वैद्यकीय अधिकारी, १ आरोग्य सेविका, १ आरोग्य कर्मचारी, १ वाहनचालक आवश्यक त्या प्राथमिक औषोधपचाराच्या साहित्यासह कार्यरत असणार आहे. तसेच आरोग्य पथकाला रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली जाणार आहे. गणेशभक्तांना वैद्यकीय सुविधेत कोणतीही कमतरता भासणार नाही. याची खबरदारी आरोग्य विभाग घेत असल्याची माहिती, जिल्हा आरोग्य अधिकारी मनिषा विखे यांनी दिली आहे.

# गणेशोत्सवपूर्वी रस्त्यांची डागडुजी करावी : निलेश सोनावणे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आगामी गणेशोत्सवपूर्वी पनवेल महानगर पालिका हद्दीतील सर्व रस्त्यांची डागडुजी करावी, रस्त्यांची अपूर्ण कामे पूर्ण करावीत अशी मागणी रिपाई पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी पनवेल महानगर पालिकेकडे केली आहे.



पनवेल महानगर पालिका आयुक्त मंगेश चितळे उपायुक्त कैलास गावडे यांना याबाबत पनवेल रिपाई च्या वतीने निवेदन देण्यात आले.यावेळी पनवेल महानगर पालिका क्षेत्र अध्यक्ष प्रभाकर कांबळे, कामोठे शहर अध्यक्ष मंगेश धिवार, पनवेल युवा अध्यक्ष अक्षय अहिरे, गौतम पाटेकर, कामोठे वॉर्ड अध्यक्ष विक्रांत सुतार उपस्थित होते .

पनवेल महानगर पालिका क्षेत्रात रस्त्यांची दुर्दशा झाली आहे आगामी सणांच्या तोंडावर अशी परिस्थिती राहिल्यास ठीक ठिकाणी वाहतुक कोंडी, तसेच नागरिकांना मणक्याचे आजार होऊन आरोग्यावर परिणाम होत आहेत त्यामुळे सर्व रस्ते तातडीने दुरुस्त करावी असे मागणी करण्यात आली आहे

पनवेल महानगपालिका क्षेत्रातील रस्त्यांची अर्धवट कामे तातडीने पूर्ण करावीत. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या पडघे, ओवे, खारघर, तुर्भे, टेम्भोडे, पाले, देवीचा पाडा, नागडारी, धानसर, घोट, पेंधर, तळोजे मजकूर, रो-हिंजन, वळवली, करवले आदी भागातील रस्ते, गटारे, नागरी सुविधांवर भर द्यावा.

पनवेल महानगर पालिकेच्या सामाजिक कल्याण, सामाजिक विकास विभागाकडून सर्व योजनांची अंमलबजावणी करावी. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची तसेच मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने अंतर्गत बौद्ध समाजातील पात्र व्यक्तींना भगवान गौतम बुद्धांचे जन्मस्थळ असलेले लुम्बिनी (नेपाळ) बुद्धगया, सारनाथ, कुशीनगर अशा ठिकाणी दर्शनासाठी नेण्याच्या योजनेची अंमलबजावणी करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

# बोरघाट महामार्गावर जड-अवजड वाहनांना वाहतुकीसाठी बंदी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक ४८) बोरघाट या महामार्गावर जड-अवजड वाहतुकीमुळे वारंवार होणारे अप-घात रोखण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना म्हणून या अधिसूचनेच्या दिनांकापासून ते पुढील आदेश होईपर्यंत मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक ४८) बोरघाट या महामार्गावर सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांच्या वाहतूकीसाठी पूर्णत: बंद करण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

सदर कालावधीकरीता रायगड जिल्हा हद्दीमधील वाहतूक सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांच्या वाहतूकीकरीता बंद करण्याबाबत पोलीस अधीक्षक रायगड यांच्या पत्राच्या अनुषंगाने मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक ४८) बोरघाट हा तीव्र चढउताराचा वाळणाचा रस्ता असल्याने या महामार्गावरील यापुर्वी घडलेल्या अपघातांच्या घटनांमुळे तसेच सद्यस्थितीत वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून उपाययोजना व जनतेच्या सुरक्षिततेसाठी या महामार्गावरुन जड-अवजड वाहतूक पूर्णपणे बंद करणे आवश्यक असल्याबाबत जिल्हाधिकारी यांची खात्री झाली आहे.



**म्हसळा नगरपंचायत मार्फत संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पालखी सोहळा नगरामध्ये भक्तिमय वातावरणात, मोठ्या उत्साहात पार पडला. कीर्तन, भजन, हरिपाठ, वाजंत्री-लेझीम पथक यांच्या सादरीकरणात संपूर्ण शहर भक्तिरसात न्हालं!**

# महावितरण आणि पाऊस यांची कुंडली बघितल्याशिवाय पर्याय नाही, श्रीवर्धन तालुक्यात विजेचा खेळ खंडोबा

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

संपूर्ण महाराष्ट्र राज्याला मुसळधार पावसाने झोडपून काढल आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यासह श्रीवर्धन तालुक्याती सुध्दा मुसळधार पाऊस रविवारी रात्रीपासून सुरू होता. परंतु पाऊस सुरू झाल्यानंतर नेहमीच महावितरण कडून वीजपुरवठा खंडित करण्यात येतो. याची अनेक कारणे असतात. काही वेळेला वीजा चमकत असतील किंवा वारा सुटला असेल तर महावितरण कंपनी वीजपुरवठा खंडित करते. तर अनेक वेळा पावसामुळे वीज वितरणात बिघाड होतात. पावसाळा सुरू होण्याअगोदर महावितरण कडून अनेक वेळा पावसाळ्यापूर्वीची देखभाल व दुरुस्ती यासाठी आठवड्यातून दोन दोन वेळा संपूर्ण दिवसभर वीज पुरवठा खंडित ठेवण्यात येतो.

यावेळी खरोखर देखभाल व दुरुस्ती केली जाते, की छुप्या पद्धतीने भारनियमन केले जाते. हा प्रश्न वीज ग्राहकांना पडला आहे. कारण अनेक वेळा देखभाल व दुरुस्तीची कामे करून सुद्धा, त्याचप्रमाणे अनेक वेळा वीज वाहकतारांच्या आजूबाजूच्या झाडांच्या फांद्या तोडून सुद्धा, थोडासा पाऊस पडला तरी वीज पुरवठा खंडित होतो. या मागचे कारण काय? असा प्रश्न देखील उपस्थित होत आहे. काही वर्षांपूर्वी पाभरे येथून श्रीवर्धन कडे येणारी वीज वाहिनी हॉटेल रवी प्रभा या नेरूळ गावाजवळ असलेल्या ठिकाणापर्यंत भूमिगत टाकण्यात आली होती. मात्र म्हसळा श्रीवर्धन मार्गाचे रुंदीकरणाचे काम करताना सदर भूमिगत वीज वाहिनी खराब झाली आहे. त्यामुळे महावितरणने एवढा खर्च करून देखील श्रीवर्धन वासीयांच्या माथी अंधारच ठेवला आहे. आगामी काळात गणेशोत्सव, शारदीय नवरात्रोत्सव हे सण येणार आहेत. यावेळी तरी वीज पुरवठा व्यवस्थित सुरू राहावा, याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांनी काळजी घेणे आवश्यक आहे., महावितरणचे कर्मचारी जर का कमी पडत असतील तर ठेकेदारी तत्त्वावर घेतलेल्या कामगारांकडून दुरुस्तीची कामे तातडीने करून घ्यावी. पाभरे येथून श्रीवर्धन कडे येणाऱ्या विद्युत वाहिन्या या काही ठिकाणी खाडीमार्गातून आलेल्या आहेत.

त्यामुळे नेहमी त्याच ठिकाणी बिघाड होतो. त्यामुळे सदरचे काम करण्यासाठी खूप वेळ लागत असल्याने पूर्ण श्रीवर्धन तालुका अंधारामध्ये राहण्याचा प्रकार घडत असतो. तरी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी खाडीपात्रापासून रस्त्याच्या मार्गे जर का वीज वाहिन्या टाकल्या, तर दुरुस्तीची कामे लवकरात लवकर करता येतील. या सर्व विजेच्या लपंडावामुळे नागरिकांकडून कुतूहलाने बोलले जात आहे की, पाऊस आणि महावितरण यांची कुंडली बघितल्याशिवाय पर्याय नाही. कारण पाऊस आणि महावितरणचे कधी जमेल व श्रीवर्धन वासियांना सुरळीत वीज पुरवठा केव्हा मिळेल अशी इच्छा सर्वच नागरिकांमधून व्यक्त होत आहे. तरी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी वीज पुरवठा नेहमी सुरळीत राहील. याकडे जास्तीत जास्त लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.